# जिल्हा निवड समिती, पुणे
# अनुसूचित जमाती (ST) विशेष भरती मोहिम

**जाहिरात क्रमांक -१/संक्षिप्त/२०१९** **दिनांक २७-१२-२०१९**

**पुणे जिल्हा परिषदेकडील गट-क संवर्गातील अनुसूचित जमातीमधील (ST) पदे भरण्यासाठीची जाहिरात सन २०१९-२०**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडील शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२१६/(प्र.क्र. ६५/१६)/१३-अ दिनांक १३ जून २०१८, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडील शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र. ३०८/१६-ब, दिनांक २१ डिसेंबर २०१९ व शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र. २२६/भाग-२/आस्था ८, दिनांक २४ डिसेंबर २०१९ व उप सचिव, ग्राम विकास विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण- २०१९/प्र.क्र. ११९०/आस्था-१४, दिनांक २६-१२-२०१९ व समक्रमांक दि. २७-१२-२०१९ नुसार, जिल्हा परिषद पुणे अंतर्गत गट- क मधील अनुसूचित जमातीमधील खालीलप्रमाणे पदे, **अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्रधारक** उमेदवारांमधून भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पदांचा तपशील**

| अ.क्र. | पदाचे नाव | भरती करावयाची पदे |
|---|---|---|
| १ | शिक्षण सेवक वर्ग-३ (गट क)<br>(बिगर अनुसूचित क्षेत्र- Non PESA) व (अनुसूचित क्षेत्र- PESA) | ३२ |
| | एकूण पदे | ३२ |

**उपरोक्त शिक्षण सेवक पदे ही प्राधान्याने अनुसूचित क्षेत्रासाठी (PESA क्षेत्रासाठी) स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरण्यात येतील. तथापि स्थानिक अनुसूचित जमातीचे पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे बिगर अनुसूचित क्षेत्रातील (Non PESA क्षेत्रातील) अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून बिगर अनुसूचित क्षेत्रासाठी (Non PESA साठी) भरण्यात येतील.**

विशेष भरती मोहिमेअंतर्गत वरीलप्रमाणे पदे भरतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

**१. जाहिरात प्रसिध्दी दिनांक : दिनांक २८-१२-२०१९.**
**२. अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक : दिनांक ६-१-२०२० सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत.**

**वरील पदांमध्ये व पदसंख्येमध्ये बदल व वाढ किंवा घट करण्याचे अधिकार निवड समिती, पुणे यांना राहतील.** याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही किंवा वाद उपस्थित करता येणार नाही. सरळसेवा भरती प्रक्रियेची सविस्तर जाहिरात, अर्जाचा नमुना व लेखी परीक्षा प्रवेशपत्र नमुना पुणे जिल्हा परिषदेच्या www.punezp.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वरील पदांची सामाजिक आणि समांतर आरक्षणनिहाय माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव, किमान व कमाल वयोमर्यादा, भरती प्रक्रिया शुल्क, अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना, परीक्षेचे स्वरूप, निवड पद्धत व सर्वसाधारण अटी व शर्ती इत्यादीबाबतची माहिती www.punezp.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

स्थळ : पुणे, दि. २७-१२-२०१९.

| | | |
|---|---|---|
| **सही/-** | **सही/-** | **सही/-** |
| **सदस्य सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |
| **जिल्हा निवड समिती** | **जिल्हा निवड समिती** | **जिल्हा निवड समिती** |
| **तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे** | **तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे** | **तथा जिल्हाधिकारी, पुणे** |